## विशेष दिवाणी दावा क्र. ७५/२०२५ मधील निशाणी ४१ वरील आदेश

## (नसरुद्दीन मुजावर विरुध्द सलीमा पठाण)

## CNR No.MHSN050029632025

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ७ ने कागदपत्रं दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षाचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ७ चे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, उभय पक्षातील वाद निराकरणाकरिता प्रस्तुत अर्जासोबत जोडलेले कागदपत्र उपयुक्त आहे. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली. याउलट, वादीचे विद्वान विधीज्ञांनी असे प्रतिपादन केले की, कागदपत्र पुराव्यानिशी सिध्द झाल्याशिवाय त्याचा विचार करता येणार नाही. सबब, त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीनी प्रतिवादी क्र.७ विरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळणेबाबत व प्रतिवादी क्र. १ ते ६ व ७ यांचे वाद मिळकती संदर्भात दिनांक ०८/०७/२०२५ चे खरेदीखत दस्त क्र.३४१७ अवैध असल्याचे घोषीत करणेबाबत दावा दाखल केल्याचे दिसते. प्रस्तुत अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते वाद मिळकतीसंदर्भात असल्याचे दिसते. मान्य आहे की, कोणतेही कागदपत्र सक्षम पुराव्यानिशी सिध्द झाल्याशिवाय त्याबाबत विवेचन करणे किंवा त्यांचा आधार घेणे संयुक्तीक होत नाही. परंतु कागदपत्र सिध्द करण्याकरिता ते प्रथमतः अभिलेखावर दाखल करुन घेणे क्रमप्राप्त ठरते. प्राप्त परिस्थिती, दाव्याचे स्वरुप व प्रस्तुत अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांचे स्वरुप लक्षात घेता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, अर्ज मंजूर करण्यायोग्य आहे. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

कागदपत्र दाखल करुन घेण्यापुरता अर्ज मंजूर करण्यात आला.

KARLEKAR BHAGWAN MAHAJAN

Digitally signed by KARLEKAR BHAGWAN MAHAJAN
Date: 2026.01.06 11:42:40 +0530

**इस्लामपूर.** **(भगवान म. कारलेकर)**

**दिनांकः- ०३/०१/२०२६.** **सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – सतिश कृष्णा पाटील,

कोर्टाचे नाव – सह दिवाणी न्यायालय व. स्तर,
इस्लामपूर.

आदेश घोषीत दिनांक – **०३/०१/२०२६**

पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक– **०६/०१/२०२६**